# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा. क्र.  58/2024        दिनांक : 12.02.2024

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 10.02.2024 रोजी चे सायंकाळी 05.15 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर सिडको नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस तु लडके लेके क्यों बहोत घुमरा असे म्हणुन शिवीगाळ करून तेरकु आज खत्तम करता म्हणुन त्याचे कमरेचे खंजर काढुन खुन करण्याचा प्रयत्न केला. हमारे खिलाफ पोलीस स्टेशन में केस करा तो तेरे तुकडे करता अशी धमकी दिली. वगैरे **फिर्यादी आर्यन संतोष कांचनगिरे, वय 16 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. संभाजी चौक सिडको नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 109/2024 कलम 307, 504, 506, 34 भादवी सह कलम 4/25, 4/27 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जामोदकर, मो.क्रं. 9923895077** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**कुंटूर :–** दिनांक 10.02.2024 रोजी चे 19.00 वा. सुमारास, **फिर्यादीचे शेतात मौ. सालेगाव शिवार ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे शेत गट क्रमांक 353, 349 मधील अंदाजे 18 क्विंटल हरभऱ्याचे पीक किंमती 1,08,000/–रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी चंपत बापुराव मनोरे, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती रा. सालेगाव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 20/2024 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1198 कंधारे, मो. नं. 8856080025** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**1)कुंटूर :–**दिनांक 07.02.2024 रोजी चे 22.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर मौ. बरबडा ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद पंधरा आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन जुन्या भांडणाच्या कारणावरून हातात लोखंडी रॉड, कत्ती व काटया घेवुन घरात घुसून फिर्यादीस व त्याचे नातेवाईकास मारहाण करून फिर्यादीचे उजव्या हातावर मारून गंभीर दुखापत केली व विटा फेकुन मारून डोके फोडले व अश्लील भाषेत शिवीगाळ करून थापडा बुक्याने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी पार्वती शिवाजी एडके, वय 52 वर्षे, व्यवसाय मजुरी आशा वर्कर प्राथमीक आरोग्य केंद्र बरबडा ता. नायगांव जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरन 21/2024 कलम 143, 147, 148, 294, 452, 326, 337, 338, 323, 504, 506, भादवि कायदा कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2315 सोनकांबळे, मो.नं. 9049117415** हे करीत आहेत.

**2)बारड :–**दिनांक 11.02.2024 रोजी चे 09.00 वा. चे सुमारास, **मौ. धनज शेत शिवार ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीची एक म्हैस आरोपीच्या शेतामध्ये गेल्याचे कारणावरून शिवीगाळ करून फिर्यादीस व फिर्यादीचा भाऊ नामे गजानन मारोती खवास यांना आरोपीतांनी त्यांचे हातात कुऱ्हाड, कत्ती, लोखंडी रॉड व काठी घेवुन फिर्यादीवर चाल करून मारहाण करून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी गोविंद मारोती खवास, वय 24 वर्षे, व्यवसाय शेती रा. धनज ता. मुदखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरन 11/2024 कलम 143, 147, 149, 326, 323, 504, भादवि कायदा कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री केदासे, मो.नं. 8483026950** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 11.10.2015 ते दिनांक 23.12.2024 चे 12.00 वा. चे दरम्यान, **सुर्यादास नगर सेलु जि. परभणी ह. मु. जयहिंद पार्क सिडको नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे वडीलांकडुन संस्थेवर पैसे भरण्यासाठी दहा लाख रूपये घेवुन ये म्हणुन आरोपीतांनी शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 110/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/811 यालावार, मो.क्रं. 9284351496** हे करीत आहेत.

**2)मुक्रामाबाद :—** दिनांक 28.08.2022 ते दिनांक 11.02.2024 दरम्यान, **मौ. भवानी बीजलगाव ता. कमलनगर जि. बिदर राज्य कर्नाटक ह. मु. भेंडेगाव बु. ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस, तुला स्वयपांक येत नाही, तुला नांदायचे असेल तर तु माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस मारहाण व शिवीगाळ करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 20 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 18/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री ताहेर, मो.क्रं. 8421437070** हे करीत आहेत.

**3)लोहा :—** दिनांक 24.06.2014 ते दिनांक 07.11.2023 दरम्यान, **फिर्यादीचे माहेरी सायाळ रोड शिवाजी चौक लोहा ता. लोहा जि. नांदेड व सासरी तामथरे ता. सिंदखेड जि. धुळे येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला घरातील काम येत नाही, तुझे माहेरच्यानी लग्नात हुंडा कमी दिला आहे. व संसार उपयोगी साहित्य कमी दिले आहे. तुला मुलगी झाली मुलगा झाला नाही असे म्हणुन सतत टोचुन बोलणे व किरकोळ कारणावरून मारहाण व शिवीगाळ करून तु जर तुझे माहेरहुन घर बांधकामासाठी दोन लाख रूपये आणले नाही तर जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 27 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 38/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2117 लाडेकर, मो.क्रं. 9423305906** हे करीत आहेत.

**4)किनवट :—** सन 2018 पासुन दिनांक 11.02.2024 चे दरम्यान, **मौ. रूक्मिनीनगर गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला. आरोपी क्रं 2 हिने फिर्यादीचे फोनवर फोन करून तुझे नवऱ्याला मी सोडत नाही असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 33 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 29/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 507, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1913 राठोड, मो.क्रं. 9420667812** हे करीत आहेत.

## 5)पळवुन नेले :—

**मुक्रामाबाद :—** दिनांक 10.02.2024 रोजी चे सकाळी 10.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरून मौ. बापशेटवाडी ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा नामे शिवसाई श्रीकांत पाटील, वय 17 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. बापशेटवाडी ता. मुखेड जि. नांदेड** यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले आहे. वगैरे **फिर्यादी श्रीकांत नागनाथ पाटील, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. बापशेटवाडी ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 19/2024 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2319 सिंध्देश्वर मो.क्र. 7620481485** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :—

**1)वजिराबाद :—**दिनांक 10.02.2024 रोजी चे 13.45 वा. चे सुमारास, **गुरूद्वारा गेट 01 चे बाजुस सुखमनी गिफ्ट सेंटरच्या समोरील रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या पाच तलवार व दोन धारदार खंजर बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री माधव नामदेव केंद्रे, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 58/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2575 कांबळे, मो.नं. 9552303028** हे करीत आहेत.

## 7)विज पडुन मृत्यु :—

**मुदखेड :—**दिनांक 11.02.2024 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **मौ. पिंपळकौठा (चोर)शिवार ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे दत्ता दिगांबर वाघमारे, वय 20 वर्षे,** रा. पिंपळकौठा (चोर) ता. मुदखेड जि. नांदेड, हे शेतातुन घराकडे येत असतांना त्यांचे अंगावर विज पडुन जागीच मरण पावला. वगैरे **खबर देणार माधव संभाजी वाघमारे, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. पिंपळकौठा (चोर) ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मुदखेड** आ. मृ. 02/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2271 ढाले, मो.नं. 9823035542** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड